Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Kolhapur - 416004
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.**

Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103 FAX:[0231]2690758
E-Mail: divsec.kop@gmail.com Web : sscboardkolhapur.in

**परीक्षा महत्वाचे**

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/ ६००
दिनांक :- २१/०६/२०२३

प्रति,
प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२ वी ) पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्ट २०२३ विद्यार्थ्यांची अतिविलंब/ विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत..**

**संदर्भ :-** १. क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/५७८ दि.१२/०६/२०२३
२. क्र.रा.म./परीक्षा-८/२५८९ दि.२०/६/२०२३

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मंडळ विनियम १९७७ नियम क्र.९३ अन्वये जुलै-ऑगस्ट २०२३ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्र ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि.१८/०६/२०२३ रोजी समाप्त झालेली आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची विलंब शुल्काची निर्धारित मुदत संपल्यानंतर अतिविलंब/ विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा व इतर तपशिलवार माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.५०/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे ) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.१००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अति विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.२००/-प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे ) |
|---|---|---|---|
| उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा | सोमवार दिनांक २६/०६/२०२३ ते रविवार दिनांक ०२/०७/२०२३ | सोमवार दिनांक ०३/०७/२०२३ ते रविवार दिनांक ०९/०७/२०२३ | सोमवार दिनांक १०/०७/२०२३ ते सोमवार दिनांक १७/०७/२०२३ |

सदर आवेदनपत्र कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्यानंतर विद्यार्थी व प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह सोबतच्या विहित परिशिष्ट (अ) नुसार आवश्यक कागदपत्रासह परिपूर्ण प्रस्ताव आवेदनपत्राची Print Out व आवेदनपत्र विभागीय मंडळात जमा करण्याच्या दिवसापर्यंतचे अतिविलंब/ विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्क भरणे आवश्यक आहे. **सदर शुल्क मंडळाकडे प्राप्त झाल्यानंतरच अर्ज ग्राहय धरण्यात येईल.**

आवेदनपत्र भरलेली Print out,परीक्षा शुल्क भरलेले चलन, अनुत्तीर्ण गुणपत्रिका छायाप्रत, परिशिष्ट 'अ' मेडिकल सर्टिफिकेट, इ. कागदपत्रे ज्यादिवशी मंडळात हस्तपोहोच सादर करतील त्या दिवसापर्यंत अतिविलंब/ विशेष अतिविलंब /अति विशेष अतिविलंब शुल्क ऑनलाईन भरण्यात यावे. प्रस्तावा सोबत अशा विद्यार्थ्यांने विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षाकेंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेऊन ते मंडळास प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

वरील सर्व कागदपत्रे मंडळास हस्तपोहच सादर करण्याची जबाबदारी कनिष्ठ महाविद्यालय/ विद्यार्थी यांची राहील. कोणत्याही परिस्थितीत सदर कागदपत्रे पोस्टाने/ कुरिअरने पाठविण्यात येऊ नयेत. अपूर्ण कागदपत्रे प्रस्ताव/ कमी परीक्षा शुल्क/ विशेष दंड मुदतीत मंडळास सादर न केल्यास विद्यार्थ्यास परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी. तसेच **कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.**

**(डी.एस. पोवार)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**सोबत- विहीत परिशिष्ट (अ) नमुना.**
प्रत माहितीस्तव:-
१) मा.शिक्षण उपसंचालक,कोल्हापूर विभाग कोल्हापूर
२) शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद, सातारा, सांगली, कोल्हापूर.

## परिशिष्ट–अ

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

परीक्षेचे नावः ----------------------------------

विभागीय मंडळाचे नावः ------------ विभागीय मंडळ

प्रकरणिका क्रमांकः ----------------------------

विद्यार्थ्यांची मुदतबाहय आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस

**इ.१२ वी**

१) विद्यार्थ्यांचे नाव : ------------------------------------------------------------

२) क. म. वि. नाव व पत्ता : ------------------------------------------------------

३) क. म. वि. सांकेतिक क्रमांक : ---------------------------------------------------

४) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्याबाबत खालील कारणासमोर (✓) खूण करावी.

अ ( ) विद्यार्थ्यांचा प्रलंबित आजार
ब ( ) विद्यार्थ्यांच्या पालकाचे आकस्मिक निधन
क ( ) नैसर्गिक आपत्ती
ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास
इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास.

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.

अ ( ) विद्यार्थ्यांचा प्रलंबित आजार
ब ( ) विद्यार्थ्यांच्या पालकाचे आकस्मिक निधन
क ( ) नैसर्गिक आपत्ती
ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास
इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास

६) कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांची शिफारस :-

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

प्राचार्य स्वाक्षरी व शिक्का

८) अ) अतिविलंबाचे एकूण दिवस : -------- ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम ----------

क) दंड कशाप्रकारे भरला – रोख/धनाकर्ष (डी.डी.)/चलन क्रमांक ------------------

ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस ------------------------------------------

------------------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक १३ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्याने आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,
विभागीय मंडळाचे नाव व शिक्का